<u>शुध्दीपत्रक क्रमांक - २</u>

## अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग,
## महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००८ यांचे कार्यालय

**दिनांक :- ०५/०८/२०२६**
**ठिकाण :- पुणे.**

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिपत्याखालील गट (क) संवर्गातील सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांची १६ रिक्त पदे सरळसेवेने भरणे बाबत दिनांक १०/०२/२०२६ रोजी www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर <u>जाहिरात</u> प्रसिध्द करण्यात आली आहे. तद्नंतर **दिनांक ०५/०३/२०२६** रोजी सदर भरती बाबतचे शुध्दीपत्रक नमूद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे ते याव्दारे रद्द करण्यात येत आहे. नमूद भरतीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे **शुध्दीपत्रक क्रमांक २** निर्गमित करण्यात येत आहे.

**I) जाहिरात दिनांक १०/०२/२०२६ मधील**

**४) सहायक शासकिय दस्तऐवज परिक्षक या पदाच्या परीक्षेचे स्वरुप व निवड प्रक्रिया :-**

१) परीक्षेचे स्वरुपः-

i) अर्हताप्राप्त उमेदवारांची ऑनलाइन २०० गुणांची ऑनलाइन परीक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेमध्ये भाग I मध्ये १२० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा व भाग II मध्ये ८० गुणांची निरीक्षण चाचणी ऑनलाईन पध्दतीनेच घेण्यात येईल. सदर निरीक्षण चाचणीकरिता दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुलनात्मक परिक्षणाने आकलन करुन देणे आवश्यक राहील. तसेच काही प्रश्नांची उत्तरे त्या-त्या प्रश्नानुसार द्यावी लागतील.

ऑनलाईन भाग-I ची परीक्षा १२० गुणांची असून त्यामध्ये वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश असेल. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. परीक्षेचे माध्यम मराठी/ इंग्रजी राहील. बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, इंग्रजी, मराठी, संगणक, सामान्य ज्ञान या विषयांची राहिल.

ii) २०० गुणांची ऑनलाईन परीक्षेसाठीचा कालावधी १२० मिनिटांचा असेल.

iii) उपरोक्त नमूद संकेतस्थळावर उमेदवारांकरिता ऑनलाईन परीक्षेचे स्वरुप समजणेकरिता सराव चाचणीचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परिक्षा व निरीक्षण परीक्षेमध्ये उच्चगुण प्राप्त उमेदवारामधून शा.नि. दिनांक १९/१०/२००७ नुसार रिक्त पदांच्या संख्येच्या प्राप्त गुणांनुसार व प्रवर्गनिहाय अंतिम निवड यादी <u>www.mahacid.gov.in</u> या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

## या ऐवजी खालील प्रमाणे वाचावे

**४) सहायक शासकिय दस्तऐवज परिक्षक या पदाच्या परीक्षेचे स्वरुप व निवड प्रक्रिया :-**

१) परीक्षेचे स्वरुपः-

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०४ मे, २०२२ मधील परिच्छेद ८ (क) अन्वये,**

**i) परिक्षा पेपर-I व पेपर-II अशी दोन भागात स्वतंत्रपणे असणार आहे. दोन्ही भागांची ऑनलाईन परीक्षा बहुपर्यायी स्वरुपामध्ये घेण्यात येईल. परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी राहील. पेपर-I मध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ३० गुण असुन एकुण १२० गुणांची (एकुण ६० प्रश्न) परीक्षा बहुपर्यायी पध्दतीने घेण्यात येईल. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील.**

**पेपर -II मध्ये ८० गुणांची व्यावसायीक चाचणी परीक्षा बहुपर्यायी पध्दतीने घेण्यात येईल. पेपर-II मध्ये रसायनशास्त्र (मुख्य विषय), भौतिकशास्त्र (उप विषय) व न्यायसहायक विज्ञान या विषयावरील एकुण ८० गुणांचे ४० प्रश्न विचारण्यात येतील. यामध्ये रसायनशास्त्र (मुख्य विषय)२० गुण (१० प्रश्न), भौतिकशास्त्र (उप विषय) २० गुण (१० प्रश्न) या विषयाचे एकुण ४० गुणांचे २० प्रश्न व न्यायसहायक या विषयाचे एकुण ४० गुणांचे २० प्रश्न विचारण्यात येतील. प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील.**

**जे उमेदवार पेपर-I परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांना उत्तीर्ण समजण्यात येईल व त्यांची गुणवत्ता यादी या कार्यालयाच्या www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. असे उमेदवार पेपर-II परीक्षा देण्यास पात्र ठरतील आणि त्या उमेदवारांची तद्नंतर पेपर-II व्यावसायीक चाचणी परीक्षा ऑनलाईन बहुपर्यायी पध्दतीने घेण्यात येईल. पेपर-I व पेपर-II यामध्ये एकत्रित प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल. तद्नंतर सामाजिक व समांतर आरक्षणाच्या आधारे निवडसुची तयार करण्यात येईल.**

**ii) पेपर-I परीक्षेकरीता ६० प्रश्नांना १२० गुणांकरीता एकुण ६० मिनीटांचा कालावधी असेल, पेपर-II परीक्षेकरीता ४० प्रश्नांना ८० गुणांकरीता एकुण ६० मिनीटांचा कालावधी असेल.**

**iii) या कार्यालयाचे www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांकरीता सदर ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षेचे स्वरुप समजणेकरीता अभ्यासक्रम व सराव चाचणीकरीता ऑनलाईन सराव चाचणीचा नमुना उपलब्ध करुन देण्यात येईल.**

४) बहुपर्यायी परिक्षा व **व्यावसायीक चाचणी** परीक्षेमध्ये उच्चगुण प्राप्त उमेदवारामधून महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक १९/१०/२००७ नुसार रिक्त पदांच्या संख्येच्या प्राप्त गुणांनुसार व प्रवर्गनिहाय अंतिम निवड यादी www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**II ) आवेदन अर्ज भरणेसाठी मुदतवाढ :-**

सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक या पदाचे पदभरतीकरिता ऑनलाईन आवेदन अर्ज भरणेसाठी दिनांक **१०/०९/२०२६** रोजी वेळ **२४.००** वा. पर्यंत **मुदतवाढ** देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन आवेदन अर्ज **मुदतवाढ** सुरु होण्याचा दिनांक व वेळ :- | दि.१२/०८/२०२६ वेळ १०.०० वा.पासून |
| २ | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ :- | दि.१०/०९/२०२६ वेळ २४.०० वा.पर्यंत |

**III ) यापुर्वी उमेदवारांकडुन भरण्यात आलेल्या आवेदन अर्जाची वैधता :-**

सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक या पद भरती करिता आवेदन अर्ज भरण्यास दिनांक **१०/०९/२०२६** रोजी पर्यंत **मुदतवाढ** देण्यात येत असून, यापूर्वी ज्या उमेदवारांनी तसेच माजी सैनिक उमेदवारांनी आवेदन अर्ज परीक्षा शुल्कासह यशस्वीरित्या भरलेले आहेत अशा उमेदवारांनी नव्याने आवेदन अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

**IV) जाहिरात दिनांक १०/०२/२०२६ मधील**

**६) परीक्षा शुल्क :-**

**टिप २ :-** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१७/कोषा प्रशा-४, दि.१८/०३/२०२६ नुसार उमेदवाराने ऑनलाईन शुल्क भरताना डेबिट कार्डने शुल्क भरल्यास ०.४०% एम.डी.आर (Merchant Discount Rate) शुल्क उमेदवारास भरावे लागेल.

**V) जाहिरात दिनांक १०/०२/२०२६ मधील**

**२) वयोमर्यादा :-**

अ) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५ एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयात विहीत केलेल्या कमाल वयोमर्यादेत अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक म्हणजे ११/०३/२०२६ रोजी खालीलप्रमाणे किमान व कमाल वयोमर्यादा राहिल.

| अ.क्र | आरक्षण | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | खुला प्रवर्ग | १८ | ३८ |
| २ | मागासवर्गीय उमेदवार | १८ | ४३ |
| ३ | अंशकालीन उमेदवार | १८ | ५५ |
| ४ | माजी सैनिक | सशस्त्र दलात केलेली सेवा +३ वर्षे | |

## या ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

**२) वयोमर्यादा :-**

**दिनांक १०/०९/२०२६** रोजी पर्यंत आवेदन अर्ज भरण्याची **मुदतवाढ** देण्यात येत असल्याने, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५ एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयात विहीत केलेल्या कमाल वयोमर्यादेत अर्ज करण्याचा अंतिम दिनांक म्हणजे **दिनांक १०/०९/२०२६** रोजी खालील प्रमाणे किमान व कमाल वयोमर्यादा राहिल.

| अ.क्र | आरक्षण | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | खुला प्रवर्ग | १८ | ३८ |
| २ | मागासवर्गीय उमेदवार | १८ | ४३ |
| ३ | अंशकालीन उमेदवार | १८ | ५५ |
| ४ | माजी सैनिक | सशस्त्र दलात केलेली सेवा +३ वर्षे | |

**VI) अभ्यासक्रम :-**

परिक्षेचा संपुर्ण अभ्यासक्रम पाहण्यासाठी या कार्यालयाच्या www.mahacid.gov.in या संकेतस्थळाला भेट दया.

दिनांक :- ०५/०८/२०२६.
ठिकाण :- पुणे.

**सही/-**
अपर पोलीस महासंचालक,
गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे